अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# महाराष्ट्र भाजपाला रेडीमेड विजय हवा

महाराष्ट्रातल्या नेत्यांना आता विधानसभा निवडणुकीचे वेध सुरू झाले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या लाटेप्रमाणे राज्याच्या विधानसभा निवडणुकीतही लाट येईल. आणि राज्यातले काँग्रेस सरकार भुईसपाट होईल असे मनातल्या मनातले मांडे खायला महायुतीच्या नेत्यांनी सुरुवात केली आहे.परंतु विधानसभा निवडणुकीला अजून आठ महिने आहेत. या मधल्या काळात परिस्थिती बदलू शकते.राजकारणात कोणतीच स्थिती फारशी कायम राहत नाही. मात्र एवढी गोष्ट खरी की, मोदी लाटेचे छोटे मोठे धक्के अजून वर्ष सहा महिने वेगवेगळ्या राज्यात बसू शकतात. विशेषत: पुढच्या महिनाभरात मोदींनी आपली पहिली छाप पाडण्यात यशस्वी झाले तर अनेकांची धुळधाण उडू शकते. ज्याप्रमाणे भूकंप झाल्यानंतर जी पडझड होते. तेव्हा नुकसान झालेल्या घरादारांची आवराआवर करतानाही आणखी काही गोष्टी कोसळत राहतात. पडत झडत राहतात. तसे राजकीय स्वरूपाचे ढासळत राहणे सुरू झाले. ज्याप्रमाणे बिहारमध्ये नितीशकुमार यांनी राजनामा दिला नंतर त्यावर पुन्हा विचार करण्याची वेळ त्यांच्यावर आली किंवा प्रत्यक्ष काँग्रेसमध्ये सोनिया, राहूल यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारली.

परंतु पदावर चिकटून राहण्याचे सोडलेले नाही. आता महाराष्ट्रात पृथ्वीराज चव्हाण यांनी राजीनामा द्यावा. म्हणून दबाव निर्माण केला जात आहे. तिकडे दिल्लीत आम आदमी पार्टीला पुन्हा दिल्लीत काँग्रेसच्या मदतीने सत्ता स्थापन करण्याची उपरती होत आहे. आसाममध्ये काँग्रेस सपाट झाल्याने तिथले मुख्यमंत्री गोगोई राजीनामा देत आहेत. अशा या पराभवाच्या प्रतिक्रिया उमटत असताना ज्या राज्यांमध्ये येत्या वर्ष सहा महिन्यांत विधानसभा निवडणुका येऊ घातल्या आहेत. तिथल्या भारतीय जनता पक्षाच्या आणि मित्र पक्षांच्या उत्साहाला उधाण आले आहे. मोदी लाटेमुळे आपल्यालाही सत्तेची गादी सहज मिळू शकेल. तवा तापलेला आहे तोवर आपल्यालाही सत्तेची पोळी कशी भाजून घेता येईल याची तयारी अशा राज्यांमध्ये सुरु आहे त्यात महाराष्ट्रातील भाजपा नेते आघाडीवर आहेत त्यांना तर अगदी मोदी लाटेप्रमाणे राज्यात विधानसभा निवडणुकीतही पूर्ण बहुमताची आशा वाटू लागली आहे. मित्र पक्षांना बरोबर घेऊन २७२ जागांपैकी २३० जागा महायुतीला मिळतील असे अंदाजही व्यक्त व्हायला सुरुवात झाली आहे. अनुकूल परिस्थितीचा अधिकाधिक फायदा करून घेण्यासाठी भाजपा नेत्यांनी एका नव्या वाहतुकीला सुरुवात केली आहे. संपूर्ण देशातच राजकीय वातावरण बदलले असल्याने त्याचा स्वाभाविक लाभ महाराष्ट्राला होऊ शकतो. फक्त तो करून घेण्यासाठी केवळ मोदी लाटेवर स्वार व्हायचं की महाराष्ट्रातही स्वत:ची स्वतंत्र लाट निर्माण करायची हे भारतीय जनता पार्टीला ठरवावे लागेल. परंतु राज्यात महायुतीच महाकडबोळं असल्याने मोदी लाटेचा नेम का लाभ कसा घ्यावा लागेल याचाच संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो.

### महाराष्ट्रात नवे नेतृत्वच नाही

खरे तर मोदींच्या रूपाने देशाला जसा नवा नेता मिळाला तसा महाराष्ट्रालाही हवा आहे आज महाराष्ट्रात जेवढे काही राजकीय नेते आहेत त्यांचे चेहरे पाहून आणि तीच तीच ती भाषणे ऐकून लोकांना कंटाळा आला आहे. विशेषत: आजचा महाराष्ट्रातल्या तरुणांना एका वेगळ्या अधिक वेगवान कल्पक आणि युवा नेतृत्व हवे आहे.जगाचे आणि देशाचे बदललेले चित्र राज्यातही प्रतिबिंबीत झाले पाहिजे. विकासाचे जागतिक संदर्भ राज्यातही लागू करण्याची जिद्दही नव्या नेतृत्वाने दाखवली पाहिजे.

अशी तरुण मतदारांची अपेक्षा आहे. असा एकही नेता राज्यात दिसत नाही आहेत ते सगळे टिपीकल भाषणांचा रतिब घालणारे आणि राजकारणाचे तेच ते गुऱ्हाळ चालवणारे आहेत. विशेष म्हणजे भाजपातल्या अंतर्गत लाथाळ्या इतक्या आहेत की, कोणाची लाथ कोणाला बसते आहे याचाही या नेत्यांना पत्ता लागत नाही. मोदी लाटेचा या निवडणुकीत भाजपला किंवा युतीला नक्की लाभ होईल. परंतु त्यातून मोदींसारखे राज्य कारभार करणारे नेतृत्व पुढे आले पाहिजे. विकासाचा असा काही जोर मारला पाहिजे गुजरातपेक्षाही महाराष्ट्राने नवा विक्रम नोंदवला पाहिजे. तशी जिद्द किंवा इच्छा भाजपामध्ये दिसत नाही.आणि भाजपातल्या एखाद्या तरुण नेत्याच्या मनात तशी जिद्द असली तरी महाराष्ट्रातले आडवाणी त्यांच्या मार्गात आडवे पाडण्याची शक्यता आहे.

### मोदी हवेत शहाही हवेत

खूप वर्षांनंतर राजकीय परिस्थितीत मोठे बदल घडून येत आहेत.या बदलाचा केवळ राजकीय फायदा घेणे जसे योग्य आहे तसाच तो फायदा दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी विकासाचे व्हिजन तेवढेच गरजेचे आहे. परंतु महाराष्ट्रातल्या भाजपा नेत्यांना सगळ्याच गोष्टी रेडीमेड हव्या आहेत. त्यांना मोदी रेडीमेड मिळाले. त्यातून आपल्या मापाचे यश बेतण्याचा प्रयत्न त्यांनी केला आता राज्याच्या निवडणुकीत मोदींच्या विजयाची व्यूहरचना करणारे अमित शहा त्यांनाही हवे आहेत.

उत्तर प्रदेशाची जबाबदारी पार पाडणाऱ्या अमित शहांनी फार मोठे नियोजन दाखवले आणि ८०पैकी ७१ जागा भाजपाला मिळवून दिल्या असा लोकांमध्ये समज निर्माण झाला आहे. याचा अर्थ उत्तर प्रदेशात त्या जनतेने तिथल्या भाजपा नेत्यांनी स्वत:चे काहीच डोके चालवले नाही असा होत नाही अनेक घटक आणि परिस्थितीतल्या एकत्र येण्यामुळे लाट निर्माण झाली आता अमित शहा यांना त्यांचे श्रेय दिले जात आहे. आणि अशा जादूगार अमित शहांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आपले अमूल्य मार्गदर्शन करावे, त्यापेक्षा त्यांनीच महाराष्ट्राच्या प्रचाराचे संचालन करावे अशी मनधरणी सुरू झाली आहे म्हणजेच तिथेही रेडीमेड कँपेनर महाराष्ट्र भाजपाला हवा आहे. याचा अर्थ विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी जी पायाभूत तयारी लागते तीसुध्दा आज महाराष्ट्र भाजपाकडे नाही. एकतर सुरुवातीलापासून शिवसेनेच्या भरोशावर निवडणुका जिंकण्याची भाजपाला सवय लागली. बाळासाहेब ठाकरेंच्या लोकप्रियतेचा फायदा भाजपाला होत राहिला. आतासुध्दा मोदी यांच्या लोकप्रियतेचा फायदा हवा आहे यासाठी आवश्यक तयारी लागते. जी तयारी आवश्यक आहे त्याचादेखील त्यांच्याकडे पत्ता नाही. यावरून महाराष्ट्र भाजपाला फार परिश्रम न करता जिंकण्याकरता गुजरातचे मोदी हवे आहेत आणि गुजरातचे अमित शहाही हवे आहेत. रेडीमेड यश हवे आहे.